**MHPU220015842023**

**विशेष दिवाणी दावा क्र. ३०१/२०२३**

शंकर डोंगरे वि. तुकाराम डोंगरे

**निशाणी क्र. २९ वरील आदेश**

१] सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला १०३ दिवसांचा विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे. अर्जाचे सोबत शपथपत्र दाखल केलेले आहे.

२] वादींनी त्यांचे म्हणणे निशाणी ३१ वर दिले आहे. वादी व प्रतिवादींचे विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले.

३] प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कथनानुसार ते दोघेही वयोवृध्द असुन त्यांना कायदयाची माहिती नाही. कैफियत दाखल करण्यासाठी महत्वाची कागदपत्रे देखील उपलब्ध झाली नाहीत. कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ न झाल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणुन प्रतिवादी क्र. १ व २ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला १०३ दिवसांचा विलंब माफ करण्याची विनंती केली आहे.

४] वादींनी अर्जास हरकत घेतली. वादींचे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांना दिनांक १२/०२/२०२४ रोजी दाव्याचे समन्स बजावले होते. तेव्हापासुन ९० दिवसांचे आत त्यांनी कैफियत दाखल केली नाही. त्यांनी हेतुपरस्पर कैफियत दाखल केली नाही. प्रतिवादीने जबाब दाखल करण्याचे टाळले होते. कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब हा जाणिवपुर्वक आहे. म्हणुन वादीने सदर अर्ज खर्चासह नामंजुर करण्यास सांगितले.

५] प्रतिवादी क्र. १ व २ यांना समन्सची बजावणी दि.०९/०२/२०२४ रोजी

झाली आहे. कैफियत दाखल करण्यास पाच महिन्यांचा विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. उशीराचा कालावधी व त्यासाठी नमुद केलेले कारण हे संयुक्तीक वाटते. दाव्याचे स्वरुप पाहता बचावाची संधी देणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहे. कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ झाल्यास प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांचा बचाव मांडण्याची संधी मिळेल व न्यायालयाला प्रकरणात गुणदोषावर निर्णय देता येईल. कैफियत दाखल करण्यास उशीर झालेला आहे. म्हणुन खर्च लावण्यात येत आहे.

वरील चर्चेवरुन खालील आदेश पारित करण्यात येत आहे :–

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज मंजुर केला.

**२.** प्रतिवादी क्र. १ व २ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब खर्च रुपये १०००/–(रुपये एक हजार फक्त) माफ करण्यात येत आहे. खर्च वादीला देण्यात यावा.

SARITHA VISHWAMBHARAN

Digitally signed by SARITHA VISHWAMBHARAN
Date: 2025.12.24 16:23:59 +0530

दिनांक : २४/१२/२०२५

खेड–राजगुरुनगर

(सरिता विश्वंभरन)
३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
खेड–राजगुरुनगर, पुणे

| **<u>प्रमाणपत्र</u>** | | |
|---|---|---|
| सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहे. | | |
| लघुलेखकाचे नाव | :- | सौ.व्ही. आर. रुपनर, लघुलेखक (श्रेणी - २) |
| न्यायालयाचे नाव | :- | सरिता विश्वभंरन, ३रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,खेड-राजगुरुनगर, पुणे |
| आदेशाचा दिनांक | :- | २४/१२/२०२५ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | :- | २४/१२/२०२५ |
| अपलोड केल्याची तारीख | :- | २४/१२/२०२५ |